# प्रेसनोट

*** स्वच्छ विद्यालय पुरस्कारासाठी जिल्हा परिषदमध्ये Coffee With CEO कार्यक्रम संपन्न ***

कोल्हापूर जिल्हा स्वच्छ विद्यालय पुरस्कार सन २०१७-१८ मध्ये सहभाग नोंदणीमध्ये **राज्यामध्ये प्रथम क्रमांकावर आहे.** कोल्हापूर जिल्हयातील सर्व व्यवस्थापनातील ३६८१ शाळांपैकी ३४१५ शाळांनी नामनिर्देशन भरून सहभाग नोंदवला आहे. सदरची नोंदणी १०० % पुर्ण करणेबाबतचे प्रयत्न सुरू आहेत याचाच एक भाग म्हणून चांगल्या शाळांना प्रोत्साहन देणेसाठी प्रत्येक गटातील स्वच्छ विद्यालय पुरस्कारामध्ये अग्रेसर असलेली जिल्हा परिषदेची १ प्राथमिक शाळा, १ उच्च प्राथमिक शाळा व १ खाजगी अनुदानित/विनाअनुदानित शाळा अशा प्रत्येक गटातील ३ शाळांच्या मुख्याद्यापकांसोबत 'Coffee With CEO' हा कार्यक्रम शनिवार दि.२८/१०/२०१७ रोजी सकाळी १०.३० वा.समिती सभागृह, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी (प्राथ.) मा.श्री.सुभाष चौगुले यांनी करतांना शासन परिपत्रकाचे वाचन करुन या उपक्रमाबाबत माहिती सांगितली. त्यानंतर उपस्थित सर्व शाळांना पुस्तक व गुलाब पुष्प देवून त्यांचे अभिनंदन केले. स्वच्छ विद्यालय उपक्रमांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या केंद्रशाळा पाटगाव, ता.भुदरगड, वि.मं.व्हन्नूर, ता.कागल व वि.मं. कोगील खुर्द ता.करवीर या शाळांचे सादरीकरण मुख्याध्यापकांनी केले. यानंतर 'स्वच्छ विद्यालय स्वच्छ महाराष्ट्र' टास्कफोर्स कमिटी जिल्हा परिषद कोल्हापूरच्या सदस्या सौ.लक्ष्मी पाटील यांनी उपक्रमांमध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाची मात याविषयी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण व अर्थ समितीचे सभापती मा.श्री.अंबरिषसिंह घाटगे यांनी सर्वांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.डॉ.कुणाल खेमनार यांनी सर्व मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, गटशिक्षणाधिकारी यांचेशी थेट संपर्क साधत उल्लेखनिय काम केलेबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. स्वच्छ विद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी लहान वयामध्येच रुजवून त्यांचा सर्वांगीण विकास साधत जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता व पटसंख्या वृद्धिंगत कशी होईल याबाबत उपस्थितांशी अनौपचारिक चर्चेतून सुसंवाद साधला व या उपक्रमांचे महत्व सांगितले.**

कार्यक्रम यशस्वी करणेकरिता कार्यकारी अभियंता (सशिअ) श्री.अमोल पाटील व त्यांचे सर्व सहकारी, शिक्षण विस्तार अधिकारी श्री.जे.टी.पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम.जयश्री जाधव यांनी केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार मा.श्री.तानाजी नरळे, उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी मानले.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

==================================================================

**प्रति,**
**मा.संपादक,**
**दैनिक ---------------------------**

**महोदय,**

**उपरोक्त विषयान्वये आपल्या लोकप्रिय दैनिकातून सदरची बातमी प्रसिद्ध करुन सहकार्य करावे.**

**आपला विश्वासू,**

**श्री. सुभाष चौगुले**
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

C:\Users\AS\Desktop\Press Note २८-१०-२०१७.doc